# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

---

जळगाव दि. १५ (प्रतिनिधी) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने प्रवेश देण्याचा कालावधी ३० सप्टेंबर, २०२२ पर्यंत वाढवून दिला आहे.

नुकताच नीट आणि एमबीए / एमएमएस चा निकाल जाहीर झाला आहे. यामध्ये अनुत्तीर्ण अथवा कमी गुण प्राप्त झालेले विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून या विद्यार्थांना इतर अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी ३० सप्टेंबर, २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. पदवी/पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमांना यापुर्वी १५ सप्टेंबर पर्यंत प्रवेशाची मुदत होती. उशिराने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयांमध्ये प्रवेश दिल्यानंतर तासिका पूर्ण करून घेण्याची जबाबदारी महाविद्यालयांची राहणार असून विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज आणि आवश्यक कागदपत्रे १० ऑक्टोबर, २०२२ पर्यंत जमा करून विद्यापीठास सहकार्य करावयाचे आहे.  या संदर्भात प्रवेश पात्रता विभागाकडून संबंधित महाविद्यालये, परिसंस्था आणि विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळांना पत्र पाठविण्यात आले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक:  १५ सप्टेंबर, २०२२

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी